REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# प्रशासकीय क्षेत्रात मराठीचा वापर


प्रा. डॉ. आनंदा गांगुर्डे
विद्या प्रतिष्ठानचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बारामती.

**गोषवारा**

*महाराष्ट्रात मराठी भाषा टिकवायची असेल तर, प्रशासनाच्या सर्व क्षेत्रात मराठी भाषेचा वापर वाढायला हवा. मराठी ही केवळ मातृभाषा नव्हे तर ती ज्ञान भाषा झाली पाहिजे. महाराष्ट्र संस्कृती टिकवायची असेल तर मराठी भाषा जीवंत ठेवणे काळाची गरज आहे. कारण महाराष्ट्राच्या विकासात मराठी भाषेचे योगदान फार मोठे आहे. महाराष्ट्र राज्याच्या विकासात मराठी भाषेचे योगदान तपासत असतांना वाङ्मयीन योगदान आणि विविध व्यवहारक्षेत्रातील योगदान अशा दोन्ही बाजू लक्षात घ्याव्या लागतात. केवळ वाङ्मयीन विकास म्हणजे भाषेचा विकास नव्हे. त्या राज्याची राजभाषा जेव्हा त्या राज्यातील विविध व्यवहारक्षेत्रात समर्थपणे वापरली व बोलली जाईल तेव्हाच त्या भाषेचा खऱ्या अर्थाने विकास होईल. न्यायपालिका, सचिवालय, शासकीय कार्यालय, पोलिस प्रशासन, विद्यापीठे आणि इतरही प्रशासकीय क्षेत्रात जेव्हा मराठीचा मुक्त संचार होईल तेव्हाच खऱ्या अर्थाने मराठी भाषा समृध्द आणि श्रीमंत होईल.*

**की वर्डस —** प्रशासकीय, कार्यालय, मराठी .

स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्राच्या विकासात मराठी भाषेची भूमिका नक्कीच कौतुकास्पद आहे. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ स्थापन करुन मराठी भाषेच्या विकासाला चालना दिली. त्यानंतर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'मराठी विश्वकोश' निर्माण करुन मराठी भाषा प्रशासन, विज्ञान व तंत्रज्ञान, विधी व न्याय, उच्च व व्यावसायिक शिक्षण, व्यापार—उद्योग, साहित्य आदी व्यवहारक्षेत्रात मराठी भाषा समर्थपणे वापरली जाईल अशी आश्वासक परिस्थिती निर्माण केली होती. परंतु दुर्दैवाने इंग्रजीचे भूत आपण उतरवू शकलो नाही. तर्कतीर्थांचा वारसा समर्थपणे पेलणारा विद्वान महाराष्ट्राला लाभला नाही. त्यामुळे उपरोक्त व्यवहारक्षेत्रात जाणिवपूर्वक व विशिष्ट कालमर्यादा आखून मराठीचा विकास झाला नाही हे ही तितकेच खरे. न्यायालयीन कामकाज मराठीतून चालावे अशी अधिसूचना निघूनही तिथे उत्तरोत्तर इंग्रजीलाच महत्त्व मिळत गेले. आज माहिती तंत्रज्ञानासारख्या क्षेत्रात मराठीला फारसा वाव मिळत नाही. दळणवळण, दूरसंचार, रेल्वेप्रशासन या क्षेत्रातही मराठीचा वापर अत्यंत मर्यादित स्वरुपात होतांना दिसतो. उच्च शिक्षणातही मराठीची अवस्था गुदमरल्यासारखी दिसते. एकूणच काय तर स्वातंत्र्योत्तर काळातही आपण इंग्रजीचे आक्रमण थोपवू शकलो नाही. तीनशे वर्षापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांनी या महाराष्टात स्वराज्याची स्थापना करतांना यवनांच्या महाराष्ट्रातील आक्रमणाबरोबरच त्यांच्या भाषेचेही आक्रमण



'राज्यव्यवहार कोश' तयार करुन मोठया शिताफीने परतवले होते. हुद्देदारांची मराठी पदनामे जाहीर केली. महाराष्ट्र राज्याचा सर्वांगीण विकास होऊन लोकशाही मजबूत व्हावयाची असेल तर जनसामान्यांचा शैक्षणिक स्तर उंचावला पाहिजे. त्यासाठी समग्र शिक्षण प्रादेशिक भाषांतून हवे. शासन व्यवहार लोकांच्या भाषेत सुरु झाला तर शासन प्रक्रियेत लोकांचा सहभाग वाढेल आणि खऱ्या अर्थाने कल्याणकारी राज्य अस्तित्वात येईल. हे सर्व लक्षात घेता आजच्या विविध व्यवहारक्षेत्रात मराठीचा वापर अपरिहार्य ठरतो. त्याचबरोबर राज्यव्यवहाराचीही भाषा अधिकाधिक लोकाभिमुख असणे अगत्याचे आहे. भाषेतील वाङ्मय समृध्द आहे म्हणून भाषा समृध्द होत नाही तर विविध व्यवहारक्षेत्रात ती सर्रासपणे वापरली गेल्यास, जाणीवपूर्वक तिचे संज्ञापन वृध्दिंगत केल्यास, वरच्या वर्गापासून ते तळागाळापर्यंत ती वापरली गेल्यास खऱ्या अर्थाने मराठी भाषेचा विकास होईल व पर्यायाने महाराष्ट्राचा विकास होईल. ज्येष्ठ भाषातज्ज्ञ डॉ. प्रकाश परब यांच्या मते, ''भाषांचे जतन व संवर्धन करायचे दोनच मार्ग आहेत. एक सक्ती व दोन संधी. या दोन्ही मार्गांच्या समन्वयातून मराठीचा विकास करण्याचे आव्हान आपण स्वीकारणार आहोत का? 'साहित्याचा विकास म्हणजे भाषेचा विकास' हया भ्रमातून जितक्या लवकर आपली सुटका होईल तितकी मराठीच्या विकासाची शक्यता वाढेल.''[१] अर्थातच साहित्याचा विकास झाला म्हणजेच भाषेचा विकास झाला असे मानता येत नाही.

समाजव्यवहारात भाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. समाजाची धारणा भाषेद्वारे होत असते. विचार, संवाद, निवेदन, लेखन, भाषण, श्रवण, वाचन ही संज्ञापन कौशल्ये आहेत. आपले दैनंदिन व्यवहार भाषेचा वापर करुन पूर्ण होत असतात. या दैनंदिन व्यवहारात बिनदिक्कतपणे शुध्द भाषेचा वापर झाल्यास आपोआपच भाषेचा विकास होतो. पत्रलेखन, अर्जलेखन, जाहिरातलेखन, मुलाखत, बाजारभावांचे समालोचन, प्रसारमाध्यमांसाठी लेखन माहितीपट, श्रुतिका, नभोनाटय आदी व्यावहारिक मराठीचे लेखन अधिकाधिक कसदार होणे गरजेचे आहे. त्यासाठी विद्यापीठीय अभ्यासक्रमात व्यावहारिक व उपयोजित मराठीचा अंतर्भाव बंधनकारक करणे गरजेचे आहे. पुणे विद्यापीठाची स्थापना भाषा संवर्धनासाठी झालेली आहे, पण पुणे विद्यापीठाला आज या गोष्टीचा विसर पडलेला दिसतो. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात जितके महत्त्व वाङ्मयीन मराठीला दिले जाते तितके व्यावहारिक मराठीला दिले जात नाही. भाषा विकासाच्या दृष्टीने ही बाब अत्यंत हानीकारक आहे. कोणत्याही भाषेचा विकास हा त्या भाषेच्या विविध क्षेत्रातील गुणवत्तापूर्ण वापरातून होत असतो. भाषेच्या विकासात तिच्या वापरक्षेत्रांची व्याप्ती व गुणवत्ता ही सर्वात निर्णायक गोष्ट आहे. त्यासाठी मराठी म्हणून घेणाऱ्या प्रत्येकाची ही जबाबदारी आहे. मराठी टिकली पाहिजे, वाचली पाहिजे कारण भाषेचा प्रवास मानवी संस्कृतीकडे जातो. मराठी भाषेच्या बाबत आज प्रश्नचिन्ह निर्माण होऊ पाहात आहे. ''जगात आजघडीला सुमारे सहा हजार भाषा अस्तित्वात आहेत. त्यापैकी ५० ते ९० टक्के भाषा चालू शतकाअखेर नामशेष होतील असे काही भाषावैज्ञानिकांचे भाकित आहे. याचा अर्थ जगामध्ये मोठया प्रमाणावर भाषिक ध्रुवीकरण होत असून अनेक भाषा आपला जनाधार गमावत आहेत. एकेका व्यवहारक्षेत्रातून त्या हद्दपार होत आहेत. 'आपापल्या भाषा सांभाळा' असे आवाहन युनेस्कोने जगातील भाषिक समूहांना यापूर्वीच केले आहे.''[२] मराठी भाषेच्या बाबतही चिंता नव्हे पण चिंतन करायला लावणारा हा विचार आहे. या पार्श्वभूमीवर बडोद्याचे सुप्रसिध्द भाषाभ्यासक आणि संघटक श्री. गणेश देवी यांचे कार्य नक्की कौतुकास्पद आहे. त्यांच्या संघटन कौशल्यातून नुकतीच ''भाषा वसुधा'' ही जागतिक भाषा परिषद बडोदे शहराच्या अकोटा या आदिवासी भागात संपन्न झाली. या परिषदेला जगातील जवळ जवळ ९०० भाषांचे प्रतिनिधी हजर होते. या परिषदेत बीजभाषण करतांना भालचंद्र नेमाडे म्हणतात, ''वाघ वाचले की जंगल वाचेल आणि जंगलातील प्राणीही वाचतील, असा विचार करुन व्याघ्रप्रकल्प सुरु केले जातात; तसं लहान भाषा केंद्रस्थानी मानून, त्या भाषा वाचविण्यासाठी—पर्यायानं संस्कृती आणि समाजरचना टिकविण्यासाठी कार्य करणे म्हणजे अभयारण्य वाचविणे, याचा विचार आपण केला पाहिजे.''[३] मानवी संस्कृतीचं अभयारण्य टिकविण्यासाठी भाषासंवर्धन काळाची गरज आहे. हा श्री. नेमाडे यांचा विचार राज्याच्या विकासातील भाषेची भूमिका विशद करुन प्रत्येक भाषकास नक्कीच अंतर्मुख करणारा आहे.

आज मराठी भाषेसमोर इंग्रजी भाषेचे कडवे आव्हान आहे. कोणतीही भाषा ही केवळ विचारविनिमयाचे माध्यम नसून ती राज्याच्या विकासाचे साधन असते. राज्याच्या विकासाचा महामार्ग

भाषेच्या विकासातुनच गतिमान होतो. मातृभाषा जेव्हा ज्ञानभाषा होते तेव्हा राज्यातील शासन, प्रशासन, विज्ञान — तंत्रज्ञान, विधी, शिक्षण, रेल्वे प्रशासन, व्यापार — उद्योग आदी व्यवहार क्षेत्रात ती लीलया संचार करते. दुर्दैवाने मराठी ही आपली राजभाषा असली तरी ती ज्ञानभाषा नाही. कुवत असुनही मराठीला आपण उपरोक्त क्षेत्रात रूजवू शकलो नाही. हे वास्तव नाकारता येत नाही. इंग्रजी ही विश्वाची भाषा आहे, म्हणून ती ज्ञानभाषा आहे. विश्वाच्या या ज्ञानभाषेकडे महाराष्ट्रातील तरूण पिढीचा ओघ वाढतो आहे. प्रत्येक पालक आज इंग्रजी माध्यमाचा अट्टाहास धरतो आहे. जगाच्या ज्ञानगंगेत डुबकी मारण्यासाठी मराठी मुलगा आतुर झाला आहे, कारण माहिती — तंत्रज्ञानामुळे राष्ट्राराष्ट्रातील सीमारेषा पुसट होऊन जग जवळ आले आहे. श्ळसवइसम टपसससमहमश ही संकल्पना वास्तवात येत आहे. मराठी मुलाला इंग्रजीचे स्वप्न पडणे यात वावगे असे काही नाही. जगाच्या बाजारात उभे राहण्यासाठी आज इंग्रजी भाषेशिवाय दुसरा पर्याय नाही. पण; त्यासाठी मातृभाषेचा बळी द्यावा असे नाही. मावशीला घरात घेतांना जन्मदात्या आईला घराबाहेर काढणे प्रशस्त नाही! मराठीवरील इंग्रजीचे आक्रमण थोपविण्यासाठी इंग्रजीला अस्पृश्य मानता येणार नाही व मानुही नये. कोणतीही भाषा ही ज्ञानापर्यंत पोहचण्याचे माध्यम असते. इंग्रजी भाषेत जगाचे ज्ञान एकवटलेले आहे. याचे कारण ती लवचिक आहे. इंग्रज ज्या ज्या देशात गेले त्या त्या देशाची भाषा व तिच्यातील शब्द इंग्रजीने स्वीकारले. परिणामी ती श्रीमंत झाली. मराठी विषयी आपण विनाकरण ताठर भूमिका घेतो. इंग्रजी शब्दाला जड — बोजड पर्याय देत बसतो. परिणामी असे न रूळलेले शब्द व्यवहारात वापरले जात नाहीत. परंतु रूढ झालेले इंग्रजी शब्द मात्र दैनंदिन व्यवहारात सर्रासपणे वापरले जातात. इतर भाषेतील शब्द मातृभाषेत आल्यामुळे आपली मातृभाषा कधीच भ्रष्ट होणार नाही. कारण भाषा कधीही भ्रष्ट नसते. याउलट शब्दसंग्रह वाढविल्यामुळे ती समृध्द होते. समृध्द भाषा आपोआपच सर्व व्यवहार क्षेत्रात वापरली जाते. आज आपली मुख्य अडचण हीच आहे. मराठी भाषा विकसित होऊनही ती या राज्याच्या सर्व क्षेत्रात वापरली जात नाही. विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यक, अभियांत्रिकी, विधी या ज्ञानशाखांना इंग्रजी जवळची वाटते मराठी नाही. त्यासाठी इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या नावाने बोटे मोडण्यात हयात घालविण्यापेक्षा मराठी माध्यमांच्या शाळांचा दर्जा तपासून उपायांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. इंग्रजीचा तीरस्कार करुन मराठीची समस्या सुटणार नाही. ''डोक्यावरचा सोनेरी मुकुट, पण अंगात फाटके कपडे अशा अवस्थेत मराठी मंत्रालयाच्या दाराशी उभी आहे'' अशी खंत कविवर्य कुसुमाग्रजांनी व्यक्त केली होती. अर्थात आज या परिस्थितीत बराच बदल झाला आहे. राजभाषेच्या रूपाने मराठीच्या डोक्यावर सोनेरी मुकुट आहेच, अंगातील फाटके कपडे जाऊन त्या जागी पैठणी परिधान करण्याइतपत प्रगती झाली पण; भरजरी शालू परिधान करुन सर्व व्यावहारिक क्षेत्रात लीलया विहार करण्याइतपत अभिजात भाषेचा दर्जा आपण मराठीला देऊ शकलो नाही; हे कटुसत्य नाकारता येणार नाही.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्यासाठी शासन पातळीवर प्रयत्न सुरु आहेत. राज्य मराठी विकास संस्था आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ या दोन्ही संस्था त्यासाठी प्रामाणिकपणे झटत आहेत. पण त्यासाठी शब्दसंग्रह, म्हणी, वाक्प्रचार, व्याकरण, शुध्दलेखन या भाषेच्या अंगासोबतच शासन व्यवहार, विज्ञान, तंत्रज्ञान, विधी या क्षेत्रातही तीचा वापर व्हायला हवा. यासंदर्भात ज्येष्ठ भाषातज्ज्ञ डॉ. न. ब. पाटील म्हणतात की, '' कोणत्याही भाषेचा समर्थपणे वापर करता येण्यासाठी त्या भाषेतील शब्दसंग्रह चांगला माहित असावयास हवा. त्याचप्रमाणे त्या भाषेच्या विशिष्ट लकबीतील वाक्यप्रयोग हेही चांगले माहित असावयास हवे. या कामात कोशाचे सहाय्य होऊ शकते. पण सर्वस्वी कोशांवर अवलंबून राहता येणार नाही. आपले विचार हे स्पष्टपणे व निसंदिग्धपणे व्यक्त करता आले पाहिजेत. त्यासाठी भाषेच्या व्याकरणिक अंगाचाही चांगला अभ्यास पाहिजे. तो जर नसेल तर शब्द माहित असूनही त्याचा समर्पकपणे उपयोग करता येणार नाही व भाषा अर्थवाहक होणार नाही. या साऱ्या अंगानी शासनव्यवहाराच्या भाषेचा अभ्यास व्हायला हावा. तरच मराठीची शासन व्यवहारविषयक शैली विकसित होईल. ही शैली आत्मसात केली की आपण आपल्या भाषिक व्यवहारात यशस्वी होऊ''. [४] असे प्रतिपादन न. ब. पाटील यांचे असून ते यथार्थ व मूलगामी आहे. मराठी भाषेचा सर्वांगिण विकास झाल्याशिवाय तिचा वापर विविध व्यावहारिक क्षेत्रात वाढणार नाही. मराठी भाषा धुरिणांनी तसा आत्मविश्वास निर्माण करावयास हवा.

एकूणच मराठी भाषेचा गेल्या ५०—५२ वर्षात विविध अंगांनी प्रयत्नपूर्वक विकास झाला आहे. परंतु महाराष्ट्र राज्याच्या विविध व्यावहारिक क्षेत्रात अजुनही आत्मविश्वासाने तिचा वापर होत नाही. इंग्रजी भाषेला प्राधान्य दिले जाते; तेव्हा इंग्रजीला टाळून मराठीचा विकास करण्यापेक्षा तिला स्वीकारुन इंग्रजी भाषेच्या सलगीने, जोडीने मराठी भाषेचे उज्ज्वल भवितव्य नक्की घडविता येईल. तरच महाराष्ट्रातील विविध व्यवहार क्षेत्रात मराठीचा सुलभपणे वापर होईल.

## संदर्भसूची : —

१. डॉ. प्रकाश परब, 'व्यवहारक्षेत्रांतील मराठी', लोकराज्य 'मराठीचे विश्व — वैश्विक मराठी', ....... विशेषांक, ऑक्टोबर २०११, पृष्ठ—५७.

२. तत्रैव; पृष्ठ—५६.

३. डॉ. भालचंद्र नेमाडे, 'बीजभाषण' — 'भाषा वसुधा परिषद', बडोदा, ........ ७—८ जानेवारी २०१२.

४. डॉ. न. ब. पाटील, 'शासनव्यवहारात मराठी', ''व्यावहारिक मराठी'' सं. डॉ. स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, प्रथमावृत्ती: सप्टेंबर १९९४, पृष्ठ; ११३.